**L. A. BILL No. LXIII OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३.**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ९ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:-

१९७७ चा महा. २८.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (११) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९७७ चा महा. २८.

"(११) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ,—

(अ) कलम ६५ च्या प्रयोजनांसाठी, कलम ६५ अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करावयाचा अधिकारी; आणि

(ब) कलम ७९-अ च्या प्रयोजनांसाठी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संबंधित विभागाचा कार्यकारी अभियंता,

असा आहे.".

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ७९-अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९-अ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(अ) "अशा इमारतीचा पुनर्विकास" या मजकुराऐवजी, "अशा इमारतीची पुनर्रचना" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (क) मध्ये, "पुनर्बांधकाम" या मजकुराऐवजी, "पुनर्विकास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३. ]**

**[ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण).**]**

**(विधानसभेने दिनांक ९ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.